# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दीपत्रक

### शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जुलै-२०२२ चा अंतरिम निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २६ ते ३० जुलै- २०२२ रोजी घेण्यात आलेल्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेचा अंतरिम निकाल दिनांक ०९/११/२०२२ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे. सदर निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व) व मुंबईसाठी शिक्षण निरीक्षक (उ.द.प.) मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना यथावकाश वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाणे व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रुपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक २१/११/२०२२ पर्यंत भरण्यात यावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

#### निकालाची संक्षिप्त माहिती

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उतीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | राखीव विद्यार्थी | शेकडा निकाल (उपस्थित अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| टंकलेखन | 50553 | 43434 | 7119 | 38184 | 12197 | 172 | 87.91 % |
| लघुलेखन | 16473 | 14809 | 1664 | 9022 | 7359 | 92 | 60.92 % |
| एकूण | 67026 | 58243 | 8783 | 47206 | 19556 | 264 | 81.05 % |

9/11/22

(संगीता घोडेकर)
सहाय्यक आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.